राज्यसेवा परीक्षेद्वारे शासन सेवेत निवड झालेल्या अधिका-यांसाठी एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत (सीपीटीपी) प्रशासकीय कामकाजास पूरक ठरणारा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : टिआरएन-०५१७/ प्र.क्र. ३६/सीपीटीपी**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : २५ सप्टेंबर, २०१९.

वाचा :

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दिनांक २०.१.२०१४.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-०२१६/ प्र.क्र. ५८/सीपीटीपी, दिनांक: ४.१.२०१७
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-०५१७/ प्र.क्र. ३६/सीपीटीपी, दिनांक: २१.०७.२०१७.
४. शासन अधिसूचना क्रमांक टिआरएन ०५१४/प्र.क्र.२०/१८ ब, दिनांक ०७.११.२०१५
५. शासन अधिसूचना क्रमांक टिआरएन ०८१८/प्र.क्र.४३/ सीपीटीपी, दिनांक ३१.१२.२०१८.

**प्रस्तावना**

राज्य सेवा परीक्षेद्वारे निवडप्राप्त ठरलेल्या उमेदवारांसाठी राबविण्यात येणाऱ्या एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी ) अंतर्गत उपरोक्त वाचा येथील अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय कामकाजासाठी पूरक असा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ( M.A. in Dev. Administration) मुंबई विद्यापिठाच्या समन्वयाने सुरु करण्यात आला आहे. या शासन निर्णयाच्या जोडपत्रामध्ये सीपीटीपी अंतर्गत प्रशिक्षण घेतले आहे, परंतु राज्य सेवा परीक्षेमार्फत पुन्हा निवड झाल्यावर संवर्ग उन्नतीकरण असल्यामुळे नवीन पदावर प्रशिक्षणासाठी पुन:श्च रुजू होणार आहेत, अशा उमेदवारांसाठी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम कसा राबविण्यात यावा याबाबतचे विवेचन देण्यात आले आहे. तथापि, सदर शासन निर्णयातील परिच्छेद १९ व जोडपत्रातील तरतूदींच्या अनुषंगाने एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी ) अंतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे व संवर्ग उन्नतीकरणामुळे पुन:श्च सीपीटीपी प्रशिक्षण तुकडीमध्ये रुजू होणार आहेत अशा उमेदवारांच्या सत्रनिहाय परीक्षा, प्रशिक्षण मूल्यांकन, त्यांना प्रदान करावयाची पदव्युत्तर पदवी इ. बाबत काही तांत्रिक अडचणी उद्भवू शकतील असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर जोडपत्रामध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता.

२. उपरोक्त वाचा येथील अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. १२ येथे गृह विभागाच्या अखत्यारितील अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), गट-अ, उप अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), गट-ब, सहायक आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), गट-ब, व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब या संवर्गातील परिविक्षाधीन अधिका-यांना पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने देण्यात येणा-या प्रशिक्षणाबाबतची कार्यवाही विहित करण्यात आली आहे. त्यानुसार या संवर्गातील परिवीक्षाधीन अधिका-यांना सीपीटीपी अंतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे सत्र-२ आणि सत्र-३ येथील प्रशिक्षणाची जबाबदारी महाराष्ट्र पोलीस अकादमी यांचेवर निश्चित करण्यात आली आहे. सीपीटीपी अंतर्गत उक्त संवर्गांसाठी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविताना आलेल्या अडचणी

विचारात घेऊन सदर संवर्गांच्या प्रशिक्षणासाठी उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेल्या तरतूदींमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः**

सीपीटीपी अंतर्गत गृह विभागाच्या अखत्यारितील पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, गट-अ, अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), गट-अ, उप अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), गट-ब, सहायक आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), गट-ब, व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब या संवर्गातील परिविक्षाधीन अधिका-यांना पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाबाबत उपरोक्त वाचा मधील अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. १२ रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी परिच्छेद १२ पुढीलप्रमाणे राहिल.

१२. गृह विभाग़ाच्या अखत्यारीतील संवर्गातील अधिका-यांना सीपीटीपी अंतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे प्रशिक्षण देण्यात येईल.

(अ) गृह विभागाच्या अखत्यारितील पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, गट-अ, या संवर्गातील परिविक्षाधीन अधिका-यांचे अभ्यासक्रम सत्र (semester) २ व ३ महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक मार्फत पूर्ण करण्यात येईल. अभ्यासक्रम सत्र (semester) २ व ३ मध्ये वर नमूद संवर्गांचे प्रशिक्षण व परीक्षा घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांचेवर निश्चित करण्यात येत आहे. यामध्ये परिवीक्षा अधिकाऱ्यांकरीता अभ्यासक्रम सत्रांचे आयोजन करणे, अंतिम परीक्षा व मौखिक चाचणी आयोजित करणे तसेच प्रशिक्षणार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालांचे एकत्रीकरण व त्यांचे मुल्यांकन इ. कार्यवाही पूर्ण करुन या सर्वांचा एकत्रित अहवाल यशदाला सादर करणे याचा समावेश आहे. याबाबत महाराष्ट्र पोलीस अकादमीने यशदा, संस्थेमार्फत मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रम मंडळाचे मार्गदर्शन घ्यावे.

(ब) गृह विभागाच्या अखत्यारितील अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), गट-अ, उप अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), गट-ब, सहायक आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), गट- ब व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब या संवर्गातील परिविक्षाधीन अधिका-यांच्या प्रशिक्षणाबाबत खालील प्रमाणे तरतूद करण्यात येत आहे.

i. अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), गट-अ, उप अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), गट-ब, सहायक आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), गट-ब, व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब या संवर्गातील परिविक्षाधीन अधिका-यांचे अभ्यासक्रम सत्र-२ ( semester-2 ) चे प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक मार्फत पूर्ण करण्यात येईल. सदर सत्राच्या अभ्यासक्रमात मैदानी प्रशिक्षण, शस्त्रास्त्र हाताळणी, न्यायवैद्यक प्रयोगशाळा यांचे प्रशिक्षण इत्यादी बाबींचाही प्रात्यक्षिक अंतर्गत मुल्यांकनामध्ये समावेश करणे आवश्यक राहील. तसेच अंतिम लेखी परीक्षेमध्ये फौजदारी तपास प्रक्रिया, फौजदारी कायदे, नियम आणि कार्यपद्धती आणि या संवर्गाच्या कामकाजाशी संबंधित भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, भारतीय पुरावा अधिनियम इ. बाबीं तसेच गृह विभाग वेळोवेळी निश्चित करेल अशा बाबींचाही समावेश करणे आवश्यक राहील. अभ्यासक्रम सत्र २ मध्ये उक्त संवर्गांचे नमूद विषयांसंदर्भातील प्रशिक्षण व परीक्षा घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र पोलीस अकादमी यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

ii. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र-३ मध्ये विभागीय परीक्षेचा समावेश करण्यात आला असल्याने विभागाने निश्चित केलेल्या ५ विषयांवर उपरोक्त ब मध्ये नमूद संवर्गातील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांची सत्र-३ ची अंतिम लेखी परीक्षा संबंधित विभागाने परीक्षा नियंत्रक, यशदा यांचेमार्फत घेणे आवश्यक राहील. या सत्रातील अंतर्गत मुल्यांकनाकरीता अनिवार्य संलग्नता या प्रशिक्षण टप्प्यामध्ये मिळालेले गुण गृहित धरण्यात येतील. त्यामुळे या संवर्गातील सर्व परिवीक्षाधीन अधिका-यांना अनिवार्य संलग्नता तसेच महाराष्ट्र दर्शन व दिल्ली भेट हे टप्पे प्रशिक्षण संस्थांमार्फत पूर्ण करणे आवश्यक राहील.

२. तसेच उपरोक्त वाचा मधील अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. १९ मध्ये नमूद केलेले शासन निर्णयासोबतचे जोडपत्र रद्द करण्यात येत असून सोबत जोडलेले जोडपत्र लागू करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९२६१०५९४५५५०७ असा आहे .सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sitaram Janardan Kunte
Date: 2019.09.26 11:02:20 +05'30'

**( सीताराम कुंटे )**
**अपर मुख्य सचिव, (सेवा)**
**सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२,
२. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२,
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (महसूल/ गृह/ ग्राम विकास/ वित्त/ सहकार/ नगर विकास/ राज्य उत्पादन शुल्क/ परिवहन/ सामान्य प्रशासन/ शालेय शिक्षण/उद्योग ऊर्जा व कामगार विभाग/ कौशल्य विकास विभाग/आदिवासी विकास विभाग).
४. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
६. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था (वनामती), नागपूर,
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (**पत्राद्वारे),
८. निवडनस्ती कार्यासन - सीपीटीपी .

# जोडपत्र

## विकास प्रशासनातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम

## एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत संवर्ग उन्नतीकरण

| अ. क्र. | संवर्ग उन्नतीकरण | अभ्यासक्रमात देण्यात येणारी सूट | अनिवार्य अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | **गट "अ" मधून गट "अ" (भिन्न संवर्ग)** (उदा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी संवर्गातून उप जिल्हाधिकारी संवर्गात उन्नतीकरण) | पायाभूत, अनिवार्य संलग्नता आणि दिल्ली व महाराष्ट्र दर्शन (सत्र १ व सत्र ३ मधील काही भाग) | तांत्रिक प्रशिक्षण, जिल्हा संलग्नता व पुनर्विलोकन (सत्र २,३ व ४) |
| २. | **गट "अ" मधून गट "अ" (विशेष बाब)** (उदा. पोलीस उप अधीक्षक संवर्गातून गट "अ" मधील भिन्न संवर्गात उन्नतीकरण) | पायाभूत प्रशिक्षण (सत्र १) | तांत्रिक प्रशिक्षण, अनिवार्य संलग्नता , दिल्ली व महाराष्ट्र दर्शन, जिल्हा संलग्नता आणि पुनर्विलोकन (सत्र २,३ व ४) |
| ३. | **गट "अ" मधून गट "अ" (समान संवर्ग)** (उदा. तहसीलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी संवर्गात उन्नतीकरण) | पायाभूत, तांत्रिक प्रशिक्षण , अनिवार्य संलग्नता आणि दिल्ली व महाराष्ट्र दर्शन (सत्र १,२ तसेच सत्र ३ मधील काही भाग) | जिल्हा संलग्नता आणि पुनर्विलोकन (सत्र ३ व ४) चे प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल. |
| ४. | **गट "अ" अथवा गट "ब" मधील कोणत्याही संवर्गातून गट "अ" मधील पोलीस उप अधीक्षक संवर्गात उन्नतीकरण** | पायाभूत प्रशिक्षण (सत्र १) | प्रशिक्षण वेळापत्रकानुसार महाराष्ट्र पोलीस अकादमी येथे |
| ५. | **गट "ब" मधून गट "अ" (समान संवर्ग)** (उदा. नायब तहसीलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी/ सहायक गट विकास अधिकारी संवर्गातून उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ गट विकास अधिकारी संवर्गात उन्नतीकरण) | पायाभूत, तांत्रिक प्रशिक्षण, अनिवार्य संलग्नता आणि दिल्ली व महाराष्ट्र दर्शन (सत्र १,२ तसेच सत्र ३ मधील काही भाग) | जिल्हा संलग्नता आणि पुनर्विलोकन (सत्र ३ व ४) चे प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल. |
| ६ | **गट "ब" मधून गट "अ" (भिन्न संवर्ग)** (उदा. सहायक गट विकास अधिकारी संवर्गातून उप जिल्हाधिकारी संवर्गात उन्नतीकरण) | पायाभूत प्रशिक्षण, अनिवार्य संलग्नता आणि दिल्ली व महाराष्ट्र दर्शन (सत्र १ आणि सत्र ३ मधील काही भाग) | तांत्रिक प्रशिक्षण, जिल्हा संलग्नता आणि पुनर्विलोकन (सत्र २,३मधील काही भाग व सत्र ४) |
| ७ | **गट "ब" मधून गट "ब" (भिन्न संवर्ग)** (उदा. सहायक गट विकास अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गात उन्नतीकरण) | पायाभूत प्रशिक्षण, अनिवार्य संलग्नता आणि दिल्ली व महाराष्ट्र दर्शन (सत्र १,२ आणि सत्र ३ मधील काही भाग) | तांत्रिक प्रशिक्षण, जिल्हा संलग्नता आणि पुनर्विलोकन (सत्र २, सत्र ३ मधील काही भाग व सत्र ४) |

**टिपः- कोणत्याही पदाकरीता वर नमूद सातही प्रकारामध्ये संवर्ग उन्नतीकरण झाले असले तरी विद्यापीठाने निश्चित केलेल्या सत्र-१ ते सत्र -४ च्या सर्व परीक्षा उत्तीर्ण होणे परिवीक्षाधीन अधिका-यांना आवश्यक राहील. या संदर्भात एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांच्या सेवाज्येष्ठतेसंदर्भात शासन अधिसूचना दिनांक ०७.११.२०१५ व दिनांक ३१.१२.२०१८ मधील तरतुदींकडे उमेदवारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.**